# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रसिद्धीपत्र

- **मा. मुख्यमंत्री यांनी निश्चित केलेल्या, सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सुरू**
- **गणेश देवल नगर येथील सार्वजनिक शौचालय व अभ्यासिकेची मा. आयुक्त यांनी केली पाहणी**

मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित केलेल्या, सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली असून, त्या अंतर्गत, आज बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी गणेश देवल नगर भाईंदर (प.) येथील सार्वजनिक शौचालय व अभ्यासिकेस भेट देऊन पाहणी केली.

मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होऊन शहराचा शाश्वत विकास घडविण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करत असते. नियमित उपलब्ध होणाऱ्या सोयी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित केले आहेत. याची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू झाली असून, त्या अंतर्गत मा. आयुक्त यांनी गणेश देवल नगर येथील सार्वजनिक शौचालयास भेट देऊन पाहणी केली. गणेश देवल नगर येथे लोकवस्ती जास्त असल्याने फायबरच्या शौचालय संख्येत वाढ करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. तसेच शौचालय दुरुस्ती कामात वापरण्यात आलेल्या मटेरियलची गुणवत्ता तपासण्याचे मा. आयुक्त यांनी सूचित केले. तसेच, संपूर्ण परिसराच्या स्वच्छतेचा मा. आयुक्त यांनी आढावा घेतला. शौचालयाच्या पाहणी बरोबरच मा. आयुक्त यांनी अभ्यासिकेस भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि अभ्यासिकेत येणाऱ्या अडीअडचणींबाबत जाणीवपूर्वक विचारणा केली. या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व माजी नगरसेवक उपस्थित होते.